# उपनिबंधक, सहकारी संस्था, आर - दक्षिण विभाग, मुंबई.

३०३, ए विंग , बी.एम.सी. गोडावून बिल्डिंग, संस्कृती कॉम्पलेक्स, ९० फुट रोड, ठाकूर कॉम्पलेक्स,कांदिवली पूर्व, मुंबई - ४०० १०१.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७अ (१)(ब-१) अन्वये आदेश**

जा.क्र.मुंबई/उपनि/आर-द / बी-२/ कलम ७७/ न्यू ज्योतिका हो/ १३८ /२०१७.
दि. १८/८/१७

वाचावे :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) मधील तरतूद.
२) संस्थेचे अध्यक्षा श्रीमती. बिना संपत यांचा दिनांक २७/०६/२०१७ रोजीचा राजीनामा.
३) संस्थेचे सचिव श्री.तलकचंद सावला सावला यांचा दिनांक २४/०६/२०१७ रोजीचा राजीनामा
४) जा.क्र.मुंबई/उपनि/आर-द / बी-२/ न्यू ज्योतिका /१३४२ /२०१७.दि.०७/०८/२०१७ रोजीचे आदेश.

ज्या अर्थी, **न्यू ज्योतिका को-ऑप.हौसिंग सोसा.लि.,एम.जी.क्रॉस रोड नं.२, कांदिवली (प.), मुंबई-४०० ०६७.** (या पुढे जिचा उल्लेख संस्था असा करण्यात आला आहे.) ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या खालील नियम १९६१ या मधील तरतुदीनुसार नोंदण्यात आलेली असून तिचा **नोंदणी क्रमांक.BOS/HSG /१८९२/१९६८** असा असून ती या कार्यालयाचे कार्यकक्षेत येते.आणि,

ज्या अर्थी, संस्थेचा कारभार अधिनियम , नियम , संस्थेचे मंजूर उपविधी , शासनाने वेळोवेळी पारित केलेले आदेश , निर्देश व परिपत्रकीय सूचना या मधील तरतुदीनुसार चालविणे बंधनकारक आहे. आणि,

ज्या अर्थी, वाचावे क्र.२ अन्वये संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती बिना संपत यांनी त्यांचेकडील दिनांक २७/०६/२०१७ च्या पत्रान्वये अध्यक्षा पदाचा राजीनामा या कार्यालयात सादर केलेला आहे आणि,

ज्या अर्थी वाचावे क्र.३ अन्वये संस्थेचे सचिव श्री.तलकचंद सावला यांनी त्यांचेकडे दिनांक २४/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सचिव पदाचा राजीनामा या कार्यालायस सादर केलेला आहे.आणि ,

ज्या अर्थी वाचावे क्र. ०४ अन्वये च्या आदेशाद्वारे न्यू ज्योतिका को-ऑप.हौसिंग सोसा.लि.,एम.जी. क्रॉस रोड नं.२, कांदिवली (प.), मुंबई-४०० ०६७.या संस्थेच्या व्यवस्थापक समिती मधील श्रीमती. बिना संपत (अध्यक्ष) व श्री. तलकचंद सावला (सचिव) यांना समितीचा सदस्य म्हणून निवडला जाण्यास किंवा राहण्यास अनर्ह करून पाच वर्षाकरिता समिती मधून काढून टाकण्यात आलेले आहे. आणि ,

ज्या अर्थी वरील परिस्थिती विचारात घेता संस्थेच्या ०६ समिती सदस्यांपैकी ०२ समिती सदस्यांना या कार्यालयामार्फ़त समितीचा सदस्य म्हणून निवडला जाण्यास किंवा राहण्यास अनर्ह करून पाच वर्षाकरिता समिती मधून काढून टाकण्यात आलेले आहे सबब सहकारी गृहनिर्माण संस्थांचे उपविधीतील तरतुदीनुसार गणसंख्या पूर्ण होत नसल्याने संस्थेच्या/ सभासदांच्या हिताकरिता समिती सदस्यांना/संस्थेच्या नोटीस बोर्डावर कायदा कलम ७७ अन्वये नोटीस देणे /प्रसिद्ध करणे स्वीकार्य /व्यवहार्य होणार नसून , संस्थेच्या व्यवस्थापक समितीमध्ये पोकळी निर्माण झाली आहे अशी माझी खात्री झाली असल्याने स्वाधिकारे विद्यमान समिती निष्प्रभावित करून संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्याकरिता / व्यवस्थापक समितीची निवडणूक घेण्याकरिता, नवीन व्यवस्थापक समिती अस्तित्वात येईपर्यंत प्राधिकृत अधिकारी नेमणूक करणे आवश्यक असल्याने मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७अ (१)(ब-१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून **मी डॉ.अविनाश भागवत, उपनिबंधक,सहकारी संस्था,आर-दक्षिण विभाग, मुंबई,** याद्वारे **न्यू ज्योतिका को-ऑप. हौसिंग सोसा.लि.,एम.जी.क्रॉस रोड नं.२, कांदिवली (प.), मुंबई-४०० ०६७.** या संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी तसेच सुयोग्य व्यवस्थापनासाठी **श्री.नित्यानंद एम.सामंत, सेवानिवृत्त लेखापरीक्षक वर्ग-१** यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.त्या साठी प्राधिकृत अधिकारी यांना मेहनताना म्हणून रु. २०००/- (अक्षरी रुपये दोन हजार मात्र ) व प्रत्यक्ष होणारा प्रवासखर्च मंजूर करण्यात येत असून सदरचा खर्च संस्थेच्या निधीतून करण्यात यावा.

Scanned by CamScanner

सदरचा आदेश आज.दि.१८/०८/२०१७ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी देत आहे.

(डॉ.अविनाश भागवत)
उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर-दक्षिण विभाग, मुंबई.

प्रत

१) **चेअरमन/ सेक्रेटरी**, न्यू ज्योतिका को-ऑप.हौसिंग सोसा.लि.,एम.जी.क्रॉस रोड नं.२, कांदिवली (प.), मुंबई- ६७.

२/- यांना कळविण्यात येते की संस्थेच्या दप्तराचा व मालमत्तेचा ताबा नियुक्त प्राधिकृत अधिकारी यांच्या कडे देण्यात यावा व तसा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

२) **श्री.नित्यानंद एम.सामंत, सेवानिवृत्त लेखापरीक्षक वर्ग-१.**

२/- यांना कळविण्यात येते की संस्थेच्या दप्तराचा व मालमत्तेचा ताबा संस्थेच्या पदाधिकार्यांकडून घेऊन तसा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा व संस्थेची निवडणूक घेण्यासाठी कार्यवाही त्वरित सुरु करावी व कामकाजाचा अहवाल वेळोवेळी सादर करण्यात यावा.

३) **शाखा व्यवस्थापक**, कॅनरा बँक , एम.जी. रोड शाखा , कांदिवली (प.), मुंबई-४०० ०६७.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर.**

१) मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (४), मुंबई.

उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर-दक्षिण विभाग, मुंबई.

7506357756

COPY RECD 1ST SET

H. J. Vasu
FOR MRS C I YASU
FLAT NO. 3&4

SP KANDIVALI F
GSTN No: 27(
EM847944
Counter No:1,OP-
To:CHAIRMAN/SECRETAR
KANDIVLI WEST, PIN:
From:UPNIBANDHAK SAHAKARI
Wt:20grams, ,19/08/2017 ,12:0
SS:18.00,
... 1.5 ,SGST @9%: 1.50

Scanned by CamScanner